ललिता गंडभीर
4200 North Ocean Dr.
#1501-2
Riviera Beach, FL 33404
USA
lalitagandbhir@hotmail.com
First Serial Rights

# रंग

(१)

झूमधले गर्द गुलाबी पंखाचे फ्लेमिंगो
म्हणे कोलंबी खाऊन गुलाबी होतात
यदाकादाचित माणसाचा रंगही खाद्यपदार्थांमुळे
बदलला असता तर
आपण सगळे हळदीमुळे पिवळे झाले असतो.

(२)

रंग बदलणारे सरडे पाहून
मनात प्रश्न उभा राहिला
हे किती विविध रंगांचे
खाद्यपदार्थ खात असतील?

(३)

मग वाटलं स्त्रियांनाही
आपला रंग बदलता आला असता
तर किती छान झालं असतं.
मी स्वतःला गोरी करून
लग्नाच्या बाजारात माझा भाव
वाढवून घेतला असता.